## नि.दि.मु.क्र. ३५/२०१० मधील निशाणी २२९ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की तिने प्रस्तुत दावा सरस निरस वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या कैफियतीमध्ये भोगांवकर कुटुंबियांच्या अन्य सामाईक मिळकती दाव्यामध्ये सामील केल्या नसल्याचा आक्षेप घेतलेला आहे. वादी ही वयोवृध्द असल्याने तिला मधल्या काळात सदर आक्षेपासंबंधी चौकशी करता आलेली नाही. फेब्रुवारी २०१९ मध्ये तिने सदर आक्षेपाबाबत महसूल कार्यालयामध्ये चौकशी केली असता प्रतिवादी क्र. १ ने वादी आणि प्रतिवादींच्या सामाईक मालकीवहिवाटीस मिळकत सर्वे क्रमांक ७७अ हिस्सा क्रमांक १/३/१अ/६ब१ यातील क्षेत्र परस्पर बेकायदेशीरपणे त्रयस्थ व्यक्तिंना विक्री केल्याचे निदर्शनास आले. प्रतिवादीने सदरची विक्री त्याच्या कैफियतीमध्ये नमूद न करता लपवून ठेवलेली आहे. त्यामुळे सदर त्रयस्थ व्यक्तिंना या दाव्यामध्ये पक्षकार करणे आवश्यक झाले आहे. त्याअनुषंगाने वादीने दाव्यात दुरुस्ती मागितलेली आहे. तिचे असे म्हणणे आहे की सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा अशी तिने विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १अ ते १क व १३अ यांनी त्यांचे म्हणणे

दाखल करुन हरकत घेतली. प्रतिवादी क्र. १अ ते १क यांचे असे म्हणणे आहे की प्रस्तुत अर्ज खोटा व खोडसाळ असून त्यास डिलेलॅचिस या तत्त्वाची बाधा येत आहे. प्रतिवादी क्र. १३अ याने अशी हरकत घेतली की वादी दाव्यात ज्या मिळकती नमूद करु इच्छित आहे त्या मिळकतीशी वादीचा संबंध नाही. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

०४. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांच्या युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. प्रस्तुत दावा वादीने सरस निरस वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या कैफियतीत वादीने दाव्यात सर्व सामाईक मिळकती दाखल केलेल्या नसल्याची हरकत घेतलेली आहे. वादी मागत असलेली दुरुस्ती त्याअनुषंगाने आहे. प्रस्तुत प्रकरण हे ५ वर्ष जुने असून पुरावा दाखल करण्यासाठी प्रलंबित आहे. दाव्याची संपरिक्षा अद्याप सुरु झालेली नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ मधील परंतुकेची बाधा प्रस्तुत अर्जास येणार नाही.

०६. वादीने अभिलेखावर सर्वे क्रमांक ७७अ हिस्सा क्रमांक १/३/१अ/६ब१/२ व हिस्सा क्रमांक १/३/१अ/६ब१/३ चे सातबारा उतारे व फेरफार क्रमांक ४४ व १८३ दाखल केलेले आहेत. त्यावरुन असे दिसते की प्रतिवादी क्र. १ ने सदर मिळकतीचे हस्तांतरण केलेले आहे. प्रस्तुत दावा वाटपासाठी असल्याने आणि सदर मिळकती सामाईक असल्याची वादीचे म्हणणे असल्याने सदर खरेदीदार म्हणजेच संभाव्य प्रतिवादी क्र. १४ व १५ हे आवश्यक पक्षकार आहेत असे माझे मत आहे. प्रतिवादी क्र.१३अ ने घेतलेला

आक्षेप की सदर मिळकतीमध्ये वादीचा कोणताही हक्क नाही हे या क्षणी विचारात घेता येणार नाही. वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा बदल होणारा नाही. किंबहुना, सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे अंतिम निकालास मदत होणारी आहे.

०७. वरील सर्व विवेचनावरुन माझे असे मत आहे की प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. मात्र अभिलेखावरुन हे स्पष्ट होते की वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दाव्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर करताना त्याचा खर्च प्रतिवादी क्र. १अ ते १क व १३अ यांना देणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

वादीने वादपत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी करावी व त्याप्रमाणे दुरुस्त वादपत्र सादर करावे.

वादीने प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये २५०/– प्रतिवादी क्र. १अ ते १क व रक्कम रुपये २५०/– प्रतिवादी क्र. १३अ यांना पुढील तारखेपर्यंत अदा करावी.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2019.10.01 14:57:29 +0530

दि. ०१/१०/२०१९ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER

| | |
|---|---|
| Name of the PO | Shri. Bhanupratap Chouhan |
| Date of pronouncement | 01/10/2019 |
| Order signed by PO on | 01/10/2019 |
| Order uploaded on | 01/10/2019 |